दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक २४८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.८ डिसेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# ५०० आणि १००० च्या नोटबंदीवर सुप्रीम कोर्टाचे सक्त निर्देश

## केंद्र सरकार आणि आरबीआयकडे मागितले सगळे रेकॉर्ड

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**सुमारे ६ वर्षांपूर्वी केंद्र सरकारनं ५०० आणि १००० रुपयांच्या नोटा बंद करण्याची घोषणा केली होती. या नोटाबंदीनंतर देशभरात मोठा गाजावाजा झाला होता. त्यानंतर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेलं. ज्यावर सर्वोच्च न्यायालयानं केंद्र सरकार आणि भारतीय रिझर्व्ह बँकला १००० आणि ५०० रुपयांच्या नोटा चलनातून बाद करण्याच्या २०१६ सालच्या निर्णयाशी संबंधित रेकॉर्ड सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. नोटाबंदीला आव्हान देणाऱ्या ५८ याचिकांवरील एकत्रित सुनावणीदरम्यान बुधवारी सर्वोच्च न्यायालयाने हे निर्देश दिले आहेत.**

केंद्राच्या २०१६ च्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर आपला निर्णय राखून ठेवताना, न्यायमूर्ती एस ए नझीर यांच्या अध्यक्षतेखालील पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाने आरबीआयचे वकील ॲटर्नी जनरल आर वेंकटरामानी आणि याचिकाकर्त्यांच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला. ज्यात ज्येष्ठ वकील पी चिदंबरम आणि श्याम दिमवन यांचाही समावेश होता. सुनावणीदरम्यान खंडपीठाने निकाल राखून ठेवल्याचं सांगितलं. भारत सरकार आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या वकिलांना संबंधित रेकॉर्ड कोर्टासमोर सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. या खंडपीठात न्यायमूर्ती बीआर गवई, न्यायमूर्ती एएस बोपण्णा, व्ही रामसुब्रमण्यम आणि बीव्ही नागरथना यांचा समावेश आहे. खंडपीठानं पक्षकारांना १० डिसेंबरपर्यंत लेखी सबमिशन देण्याची मुभा दिली. तसंच संबंधित रेकॉर्ड सीलबंद पाकिटात सादर करावे लागणार आहेत.

### न्यायव्यवस्था हातावर हात ठेवून बसू शकत नाही

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या (आरबीआय) वकिलांनी न्यायालयीन समिक्षा आर्थिक धोरणाच्या निर्णयांवर लागू केली जाऊ शकत नाही असा युक्तिवाद केला होता. त्यावर स्पष्ट शब्दात सुप्रीम कोर्टानं नोटाबंदीचा निर्णय कोणत्या पद्धतीने घेण्यात आला हे तपासण्याचा अधिकार आम्हाला आहे आणि न्यायव्यवस्था केवळ आर्थिक धोरणात्मक निर्णय असल्याने हातावर हात ठेवून पाहात बसू शकत नाही, असं सुनावलं आहे. सुनावणीदरम्यान, आरबीआयतर्फे उपस्थित असलेले ज्येष्ठ वकील जयदीप गुप्ता यांनी काळा पैसा आणि बनावट चलनाला आळा घालण्यासाठी नोटाबंदी धोरणाच्या उद्देशाविषयी न्यायालयाला माहिती दिली.



# अर्ध्या तासात बोरघाटात दोन अपघात





**दै.रायगड नगरी । खोपोली**

आज दि. ७ डिसेंबर २०२२ रोजी दुपारी १३.०५ वाजेच्या सुमारास जुन्या मुंबई-पुणे हायवेवर बोरघाटात शिंग्रोबा देवस्थानाच्या मागील बाजूस असलेल्या खिंडीतून सिलेरीओ कार (क्र. MH 05-DH-4981) खोपोलीच्या दिशेने उतरत असताना कारचालक गौरव दलाल (रा. कल्याण) यांचे कारवरील नियंत्रण सुटले आणि ती रस्त्याच्या कडेला वळणावर उलटली आणि अपघात झाला आहे.


बोरघाट वाहतूक पोलिसांनी सदर कार रस्त्याच्या बाजूला काढून वाहतुकीस मार्ग खुला केला आहे. यावेळी अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेच्या टीम मेंबर्सनी मदत केली. दुसरीकडे दि. ७ डिसेंबर २०२२ रोजीच दुपारी १३.३० वाजेच्या सुमारास जुन्या मुंबई-पुणे हायवेवर बोरघाटात अंडा पॉईंटच्या पुढील वळणावर दुसरा अपघात झाला.

मोटार सायकल (क्र. MH 43 CB 7892) वरील चालक समीर आलदर (वय २२, रा. वाशी, नवी मुंबई) हा वाशी येथून एकविरा कार्ला येथे जात असताना समोरून येणाऱ्या अज्ञात कारने मोटार सायकलला ठोकर मारल्याने नियंत्रण सुटल्याने मोटारसायकल रस्त्याच्या कडेला खड्यात पडून अपघात झाला. सदर अपघातात मोटार सायकल स्वाराचे उजवे पायाचे तळपायास गंभीर स्वरूपाच्या दुखापत झाली. उपचारासाठी त्याला ट्रॉमा केअर ॲम्ब्युलने हॉस्पिटलला नेण्यात आले आहे. वाहतूक पोलीस बोरघाट यांनी यावेळी मोटर सायकल स्वारास मदत केली असून अज्ञात कारचा शोध घेण्याचा प्रयत्न सुरू आहे.

# नेरळ धसवाडी परिसरात बिबट्याने केली बैलांची शिकार

**दै.रायगड नगरी । कर्जत**

माथेरानच्या डोंगरातील बिबट्याचा वावर वाढला असून अनेक ठिकाणी बिबट्या आल्याच्या चर्चा सुरु झाल्या आहेत.त्यात माथेरान घाटात देखील बिबट्याने टॅक्सी चालकाला दर्शन दिले असून धसवाडी मधील बैलाची शिकार केली आहे.



४ डिसेंबर रोजी नेरळ ग्रामपंचायत हद्दी मधील धसवाडी भागातील शेतकरी हरिदास लक्ष्मण आखाडे यांचा बिलाची शिकार बिबट्याने केली आहे. नेहमी प्रमाणे पहाटेच्या सुमारास चरायला सोडलेल्या जनावरांपैकी एका बैलवार बिबट्याने हल्ला करून त्याला ठार मारले आहे. पहाटेच्या वेळी धसवाडी पासून ७०० मीटर अंतरावरील जंगलात सकाळी गवत कापण्यासाठी गेलेले असताना हरिदास आखाडे यांना आपल्या बैलावर बिबट्याने हल्ला केला असल्याचे आढळून आले. बिबट्याने त्या बैलाचा एक कान कापून नेला असून त्या बैलाच्या पाठीमागील शेपटीच्या बाजूला मांस ओढून नेले होते. त्यात आता नेरळ माथेरान टॅक्सी सेवा करणाऱ्या वाहनचालक राकेश पाटील हे ५ डिसेंबर रोजी रात्री साडे नऊ वाजता माथेरान येथून नेरळ येथे टॅक्सी घेऊन येत होते.त्यांना नेरळ च्या माथेरान नाक्यापासून जेमतेम २०० मीटर अलीकडे लव्हाळवाडी भागातून थेट घाट रस्त्यावर आलेला बिबट्याच्या गाडीच्या प्रकाशात रस्त्यावर काही काळ थांबला. त्यानंतर मार्ग न दिसल्याने बिबट आल्या पावली पुन्हा लव्हाळावाडी कडे खाली उतरून परत गेला.

# पोलादपूर तालुक्यात पुन्हा पोक्सो गुन्हा

## शाळकरी विद्यार्थीनीवर लादलेय मातृत्व

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील बहुचर्चित मोरगिरी येथील अल्पवयीन मुलीला मातृत्व प्रदान करणाऱ्या नराधमांचे कृरकृत्य उघडकीस आल्यानंतर आता कापडे बुद्रुक येथील माध्यमिक विद्यालयामधील नवतरूणीवर बलात्कार करून तिच्यावर मातृत्व लादल्याच्या घटनेने तालुक्यातील नवतरूणी असुरक्षित असल्याचे पुन्हा एकदा उघडकीस आले आहे. याप्रकरणी मुंबईतील जे.जे. हॉस्पिटलमधील पोलीस ठाण्यामध्ये दाखल करण्यात येऊन पोलादपूर पोलीस ठाण्यात शून्य नंबरने तपासाला आल्याची माहिती प्राप्त झाली. याप्रकरणी पोलादपूर पोलीसांनी एका आरोपीविरूध्द गुन्हा दाखल केला असून अद्याप अटक नसल्याचे सांगण्यात आले आहे.

एप्रिल २००७ मध्ये जन्मलेली षोडशवर्षीय नवतरूणी पोलादपूर तालुक्यातील किनेश्वरवाडी येथील कापडे बुद्रुक येथील श्रीवरदायिनी माध्यमिक विद्यालयामध्ये इयत्ता दहावीच्या वर्गामध्ये शिकत असून ऑगस्ट २०२२ मध्ये माध्यमिक विद्यालयासमोरील राधाकृष्ण हॉटेलच्या मागील झाडीझुडपामध्ये भवानवाडी कापडे बुद्रुक येथील आरोपी अर्जून सकपाळ (पूर्ण नांव माहिती नाही) याने सदर पिडीता अल्पवयीन असल्याचे माहिती असूनही तिच्यासोबत मैत्री करून तिच्या ओळखीचा फायदा घेऊन तिच्यासोबत

.../२

# पेण अर्बन बँक घोटाळा ठेवीदारांचे पैसे परत करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम करावा : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

पेण अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेतील आर्थिक गैरव्यवहारांमुळे गरीब खातेदारांचे मोठे नुकसान झाले आहे, कोणत्याही परिस्थितीत गरीबांचे पैसे परत मिळाले पाहिजे यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी कालबद्ध कार्यक्रम तयार करावा, या जप्त मालमत्तांचा लवकरात-लवकर लिलाव करुन पैसे वसूल करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिले.



पेण अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेतील ठेवीदार आणि खातेदार संघर्ष समितीच्या मागण्यांबाबत चर्चा करण्यासाठी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज बैठक पार पडली. सह्याद्री अतिथीगृहात आयोजित या बैठकीस बंदरे व खनिकर्म मंत्री दादाजी भुसे, आमदार महेंद्र थोरवे, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, सहकार विभागाचे अपर मुख्य सचिव अनुपकुमार, सहकार आयुक्त अनिल कवडे, रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, रायगडचे पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, विभागीय सहनिबंधक आप्पाराव घोलकर यांचेसह महसूल, पोलीस, सहकार आणि सक्तवसूली संचालनालयाचे अधिकारी उपस्थित होते.

**बँक आर्थिक गैरव्यवहारातील वसूलीसाठी मुंबई उच्च न्यायालयाने नेमलेल्या विशेष कृती समितीने फक्त २९.१० कोटी रुपये वसूल केले आहे. या वसूलीला गती देण्यासाठी विभागीय सहनिबंधकांनी जिल्ह्यातील इतर निबंधकांचे सहकार्य घ्या, जिल्हाधिकारी, पोलीस, आणि सहकार अधिकाऱ्यांनी कालबद्ध कार्यक्रम तयार करुन जप्त केलेल्या १२१ मालमत्तांचा लिलाव करुन वसूली करण्यास गती द्यावी.**
**-: एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री**

बँकेच्या अध्यक्ष, संचालक मंडळाच्या आर्थिक गैरव्यवहारामुळे ठेवीदारांच्या ठेवींची मुदत संपली तरीही त्या परत मिळण्याची शक्यता नव्हती, त्यामुळे या ठेवींमधून घेतलेल्या ३९ मालमत्ता गृह विभागाने जप्त केल्या आहेत. महाराष्ट्र ठेवीदार हितसंरक्षण अधिनियमातील तरतुदीनुसार

.../२

**सक्तवसुली संचालनालयाने जप्त केलेल्या मालमत्तांच्या ७/१२ उताऱ्यांच्या इतर हक्कामध्ये मालमत्तेची विक्री व हस्तांतरण करण्यात येऊ नये असा शेरा नोंदविला आहे, यामुळे मालमत्तांच्या विक्रीला अडचण येत असून हा शेरा मागे घेण्यासाठी संपूर्ण सहकार्य केले जाईल,असे सक्तवसुली संचालनालयाच्या अधिकाऱ्यांनी यावेळी स्पष्ट केले.**

# पनवेल-कळंबोली वाहतूक शाखेचे वसुली डबे बंद कधी होणार?

## अनधिकृत एजन्सी मार्फत टोईंग व्हॅन धुमधडाक्यात सुरू

**दै.रायगड नगरी । अरविंद पोतदार**

**पनवेल ।** नवीमुंबई आयुक्तालयातील वाहतुक शाखेचे काही कर्मचारी अधिकारी वर्गाला अंधारात ठेवुन ई चलनाच्या माध्यमातुन मोठ्या रकमेचा दंडाचा धाक दाखवून तोड पाणी करून सर्व सामान्य नागरीकांचे जीणे मुश्किल करून हैराण केले जात आहे, असा आरोप पनवेल, कळंबोली, नवीन पनवेलच्या नागरिकांमधून तसेच वाहन चालकांतून केला जात आहे.

काही कालावधी अगोदर वाशी टोल नाक्यावर एक ईको चालक मुंबई वरून रायगड कडे येत असता वाहतुक पोलीसांनी त्याची गाडी अडविली. इको चालकाने आपल्या ताब्यातील गाडी साईडला लावुन काय झाले? असे विचारले तेव्हा वाहतूक पोलीसांनी त्या वाहनचालकाकडे लायसन्सची मागणी केली. सदर वाहन चालकाने सोबत असलेले लायसन्स वाहतुक पोलीसांना नम्रपणे दाखविले. आता लायसन्स पाहुन पोलीस सोडतील असा गोड गैरसमज त्या ईको चालकाचा झाला. परंतु ती गाडी न सोडताच वाहतुक पोलीसांनी दुसरी मागणी ईको चालकाकडे गाडीच्या पेपर्सची केली. तेव्हा वाहनचालकाने गाडीचे पेपर्स डीकीतुन काढुन वाशी वाहतुक पोलीसांना दाखविले. ते पाहिल्यावर वाहतुक पोलीसांनी ईको चालकाकडे पी.यु.सी.मागणी केली ती ही बरोबर योग्य व कायदेशीरीत्या योग्य असल्याचे पाहुन वाशी वाहतुक पोलीसांनी गाडी आतुन चेक करण्यास सुरुवात केली व आपण आपल्या ईको गाडीत सीटमध्ये बदल केला आहे, आपणास मोठा दंड बसु शकतो हे बोलुन वाहतुक पोलीसांनी चक्क ५०० रूपयाची मागणी करून तुला सोडतो आधीच दमलेला व चौकशीला त्रस्त झालेला ईको चालक चालकाने ५०० रूपये देऊन आपली सुटका करून घेतली, अशा स्वरूपाच्या पिळणुकीच्या घटना रिक्षा चालक, ईको चालक, ट्रान्स्पोर्ट ड्रायव्हर तसेच हजारो सर्व सामान्य नागरीकांना नवी मुंबई वाहतूक शाखेच्या विभागाकडून अक्षरशः पिळले जात असल्याचा आरोप नागरीकांतुन होत आहे.

नुकताच एक प्रकार पनवेलच्या मार्केट यार्ड परिसरात एका चार चाकी वाहन चालकाने आ-



पली गाडी अगदी योग्य ठिकाणी लावली असताना एक वाहतूक शाखेच्या एजन्सीचा मोटार सायकल चालक त्यांच्याजवळ येवून गाडी येथे का लावलीत? असा सवाल करीत दंड पडेल ही भिती दाखवून संबंधितांकडून चिरीमिरी घेवून त्यांना जाण्यास सांगितले. बऱ्याच वेळा वाहन चालक जात असताना आपले टार्गेट पूर्ण करण्यासाठी वाहतूक पोलिसांना मोबाईलद्वारे नकळतच फोटो काढून दंडाच्या रकमेचा वाहन चालकाच्या मोबाईलवर संदेश येताच आपण कुठे चुकलो किंवा वाहतुकीचे नियम मोडले नसतानाही

**पनवेल शहरातील ओरीयन मॉल, पनवेल उरण नाका, पंचमुखी मारूती मंदिर परिसर तसेच मार्केट यार्ड येथील वाहतुक पोलीस चौकी तसेच पळस्पा येथील वाहतुक चौकी, कळंबोली सर्कल, कर्नाळा स्पोर्टस्, टी.पॉईन्ट, शिवाजी चौक या आणि अशा विविध ठिकाणी वाहतुक पोलीस ई चलनाचा धाक दाखवुन तसेच टोचन लावून सर्व सामान्य नागरीकांकडुन जोरदार वसुली मोहीम राबवित असल्याचे बोलले जात आहे.**

वाहतूक पोलिसांच्या मार्फत विविध ठिकाणी आयुक्तलय क्षेत्रात ही मोहिम सर्रास राबविली जात असल्याने वाहन चालक त्रस्त झाले आहेत. काही ठिकाणी तर एजन्सी मार्फतच टोईंग व्हॅनचा वापर करून सर्वसामान्य वाहन चालकांना वेठीस धरले जात आहे.

मध्यंतरी पेण रामवाडी येथील पोलीस चौकीत एका बस चालकाकडुन ई चलनाचा धाक दाखवुन दोन वाहतुक पोलीसांनी रोख रक्कम उकळुन ती रक्कम कमी पडल्याने नंतर बसचा फोटो काढुन ई चलनाची कारवाई केली व बस मालकाच्या मोबाईल वर वाहतुक शाखेच्या दंडाची रक्कम रात्री बारा वाजता आल्याने मालक व संघटनेच्या पदाधिकारी यांनी दोन वाहतुक पोलीसांची घटनास्थळाची मोबाईलवर शूटींग काढुन ती व्हायरल झाल्याने पोलीस अधिक्षक रायगड यांनी सदर त्या दोन वाहतूक पोलीसांची उचलबांगडी करून त्यांची तात्काळ म्हसळा येथे तडकाफडकी बदली करण्यात आल्याचे ताजेच उदाहरण असल्याचे नागरीकांतुन बोलले जात आहे.

## आजपासून राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धेचा थरार

# युवासेना नेते आ.आदित्य ठाकरे आज रोह्यात

**दै.रायगड नगरी । रोहा**

**शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या ८२ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून ४८ वी कुमार व मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेचे आयोजन रोह्यातील प. पु. पांडुरंगशास्त्री आठवले विद्यालयाच्या स्टेडियमवर ८ ते ११ डिसेंबर दरम्यान करण्यात आले आहे.**



या स्पर्धेचा उद्घाटन सोहळा गुरुवार, दि. ८ डिसेंबर २०२२ रोजी सायं. ५ वा. आदित्यजी ठाकरे माजी मंत्री, तथा आमदार यांच्या शुभहस्ते होणार असून खा. सुनिल तटकरे, संजीवराजे निंबाळकर अध्यक्ष, महाराष्ट्र खो-खो असो., रायगड खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष तथा आमदार अनिकेत तटकरे, आ. आदिती तटकरे, सचिन गोडबोले कार्याध्यक्ष, महाराष्ट्र खो-खो असो, मधुकर पाटील अध्यक्ष, रायगड जिल्हा रा. कॉ., उमाताई मुंडे अध्यक्षा, रायगड जिल्हा महिला रा. कॉ., आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ रविवार, दि. ११ डिसेंबर रोजी सायं. ५ वा. आमदार धीरज विलासराव देशमुख यांच्या हस्ते होणार आहे. या स्पर्धेसाठी राज्यातील ४८ संघ आणि जवळपास नऊशेहून अधिक खेळाडू, पदाधिकारी रोह्यात दाखल होणार आहेत. महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने होणार्या या स्पर्धेची जोरदार तयारी रायगड जिल्हा खो-खो असोसिएशनकडून सुरु झाली आहे.

या स्पर्धेसाठी रायगड खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष तथा आमदार अनिकेत तटकरे, महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे उपाध्यक्ष विजयराव मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक पदाधिकारी विशेष मेहनत घेत आहेत. खासदार सुनील तटकरे, आमदार अनिकेत तटकरे, आमदार अदिती तटकरे यांच्या पाठबळामुळे या स्पर्धेचे शिवधनुष्य पेलण्यास पदाधिकारी सज्ज झाले आहेत. रोह्यात नऊशेहून अधिक खेळाडू, मार्गदर्शक, प्रशिक्षक व संघटनेचे पदाधिकारी दाखल होणार असून, रायगडकरांना खो-खोच्या वेगवान खेळाची मजा लुटता येणार आहे.

# सहिष्णुतेची 'सीमा'

'भाषावार प्रांतरचना ही काही साधीसुधी घटना नाही. त्या त्या प्रांतातल्या इतर अल्पसंख्याक भाषिकांच्या भवितव्याविषयी माझ्या मनात शंका नाही; मात्र बहुसंख्याकांची दृष्टी विशाल हवी आणि अल्पसंख्याकांच्या ठिकाणी सहिष्णुता हवी. प्रत्येक प्रांतातल्या अल्पसंख्याकांच्या मनातील भीती नाहीशी होण्यासाठी आणखी पुष्कळ गोष्टी करायला हव्यात,' निजामाच्या क्रूर राजवटीच्या विरोधात तीव्र आंदोलन उभारून स्वातंत्र्यानंतर पाच भाषिक समूहांची सैतानी जाचातून मुक्तता अनुभवणारे द्रष्टे नेते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या ग्रंथातील हे उद्धरण आहे. 'हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्रामाच्या आठवणी' लिहिताना स्वामीजी भाषिक, प्रांतिक, धार्मिक, राष्ट्रीय अशा समस्यांचा सांगोपांग ऊहापोह करतात आणि भविष्यात हा बहुभाषी देश नीट चालायचा, तर 'सहिष्णुता आणि सामंजस्य' हाच खरा मार्ग आहे, असे खात्रीने बजावतात. सध्या जे काही चालू आहे, त्यात सगळ्यांनी नेमकी यालाच सोडचिठ्ठी दिली आहे. भाषावार प्रांत, त्यांनी बनलेला हा विशाल भारत आणि प्रत्येक राज्यात वास्तव्य करणारे बहुभाषी नागरिक यांच्या कल्याणापेक्षा मतांचे राजकारण मोलाचे ठरले, की भाषा बदलते. आसन डळमळीत असणारे कर्नाटकाचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई ज्या भाषेत बोलत आहेत, त्याने त्यांचे राजकारण साधेलही; मात्र आधीच अशांत आणि अस्वस्थ असणारा सीमाभाग पेटून उठेल. दोन्ही बाजूंनी संघर्ष वाढेल. हे कुणालाही परवडणारे नाही. सीमा भागात महाराष्ट्रात नोंदणी झालेल्या गाड्यांवर होणारे हल्ले, म्हणजे उद्या महाराष्ट्रातल्या तशाच हिंसक प्रतिक्रियांना निमंत्रण आहे. यातून सीमा प्रश्न सुटणार नाही. केवळ कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन दोन्हीकडे निष्पाप तरुणांच्या पाठीवर वळ तेवढे उठतील. महाराष्ट्र आणि कर्नाटक यांचा सीमा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात आहे. तो निकाल कधी लागेल, हे माहीत नाही. स्वातंत्र्य मिळून सात दशके झाली आणि संयुक्त महाराष्ट्र होऊन पाच दशके उलटून गेली. प्रश्न न्यायालयात किंवा सहमतीने सुटत नाही, तोवर सर्व भागांत सर्व भाषिक नागरिकांचे शांततामय सहजीवन खरोखर अशक्य आहे का? इतके दिवस निर्माण न झालेला वेगळाच तिढा या वेळेला समोर येतो आहे. तो म्हणजे, कर्नाटक, तेलंगण, गुजरात आणि मध्य प्रदेश या सीमावर्ती राज्यांमध्ये जाण्याची सध्या महाराष्ट्रात असणाऱ्या गावांनी केलेली मागणी. अशी मागणी करण्यामागे दबाव टाकण्याचे राजकारण आहे असे गृहीत धरले, तरी अशी मागणी अनेक गावांना करावीशी वाटते, ही आजचे व कालचे राज्यकर्ते आणि सुस्त नोकरशाही यांना शरम वाटायला हवी, अशी गोष्ट आहे. कोणताही संघर्ष फुलून येताना दिसला, की विरोधकांची कोंडी करण्यासाठी जिवाचा आटापिटा करायचा, हीच कोत्या राजकारणाची सध्याची रीत आहे. तेच महाराष्ट्रात चालले आहे; मात्र १९६०मध्ये मोठ्या उमेदीने महाराष्ट्रात सामील झालेल्या या 'सीमान्त' भागांना कुंपण ओलांडून पलीकडे जावेसे का वाटते, याची दखल कोणी घेणार आहे की नाही? या सीमान्त भागांची स्पंदने जाणून घेण्याचा एक प्रयोग ज्येष्ठ संपादक सुनील कर्णिक यांच्या पुढाकाराने काही वर्षांपूर्वी झाला होता; पण सर्व पक्षांच्या सरकारांनी आजवर त्यांच्यासाठी भरीव असे काय केले? सीमेवरच्या जत तालुक्यातील गावे 'पाणी द्या, नाही तर जातो कर्नाटकात' असे म्हणतात, याची शरम आज तारस्वरात ओरडणाऱ्या किती नेते, आमदार आणि मंत्र्यांना वाटते? बेळगाव आणि परिसरातील मराठी भाषकांच्या भावना तीव्र आहेत. तीन पिढ्या झाल्या, तरी त्यांची ऊर्मी त्याच तीव्रतेने तेवते आहे. 'तुम्ही आमच्या हद्दीत राहता म्हणजे आमचे गुलाम आहात,' अशा तोऱ्याने कर्नाटक सरकारने वागू नये. तसे ते वागतील, तर महाराष्ट्राने राजकीय मतभेद बाजूला ठेवून याचे उत्तर द्यावे. मराठी मंत्र्यांनी सीमा भागात येऊ नये, असे बंधन घालणारे कर्नाटक सरकार कोण लागून गेले? 'कर्नाटक रक्षण वेदिके' ही संघटना मराठी, तमिळ, हिंदी अशा साऱ्यांनाच पाण्यात पाहते. अशा संघटनांना काळाची पावले समजत नाहीत आणि त्यांचे लांगूलचालन केल्याशिवाय मोठ्या पक्षांचे भागत नाही. महाराष्ट्रासहित सर्वच राज्यांत हे होते. संसदेचे हिवाळी अधिवेशन आज सुरू होत आहे. तेव्हा तिथे सगळे मराठी खासदार पक्षभेद विसरून हा मुद्दा मांडतील, अशी अपेक्षा आहे. वाढते तापमान मात्र आधी खाली आणले पाहिजे. स्वामी रामानंद तीर्थ यांनी ग्रंथाचा समारोप करताना म्हटले होते, 'भारतासारख्या विस्तृत देशात कोणताही आकृतिबंध स्वीकारला, तरी कसल्या ना कसल्या अडचणी उत्पन्न होत राहणारच. सहिष्णुता आणि समजूतदारपणाच्या वृत्तीनेच या अडचणींतून मार्ग निघतील.' नेमक्या याच गुणांचा त्याग करून कानडी नेते सध्या आक्रमक बनले आहेत. यातून कुणाचाच लाभ होणारा नाही. 'वसुधैव कुटुंबकम्' हे जगाला शिकवायचे आणि शेजाऱ्यांचा मात्र गळा पकडायचा, ही कसली रीत झाली?

# दत्तजयंतीनिमित्त देऊळवाडी येथे महाप्रसादाचे वाटप

## भाविक भक्तांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

**दै.रायगड नगरी । उरण**

हिंदू धर्मात गुरु या तत्वाला विशेष महत्व असून गुरुंचे प्रतीक असलेल्या व करोडो हींदुचे श्रद्धास्थान, आराध्य दैवत असलेल्या भगवान दत्तगुरु यांची जयंती महाराष्ट्रात सर्वत्र विविध समाजोपयोगी कार्यक्रमाने,धार्मिक उपक्रमांनी साजरी केली जाते.उरणमध्येही दत्त जयंती निमित्त विविध ठिकाणी धार्मिक, सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले यावेळी उरण शहरातील देऊळवाडी मधील प्रसिद्ध दत्त मंदिर जवळ असलेल्या शंकर मंदिर सभामंडप येथे देऊळवाडी युवक मंडळ व देऊळवाडी ग्रामस्थ मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पुलाव, खीर, जिलेबी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.



अन्न दान हे पवित्र दान आहे, अन्न दानाला सर्वात पवित्र व सर्वात श्रेष्ठ दान समजले जाते. उरण शहरा मधील देऊळवाडीतील प्रसिद्ध दत्त मंदिर येथे दरवर्षी देऊळवाडी युवक मंडळातर्फे दत्त जयंती निमित्त अन्नदानाचे आयोजन करण्यात येते. भाविक भक्तांची वाढती संख्या लक्षात घेवून देऊळवाडी युवक मंडळ व देऊळवाडी ग्रामस्थ मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दि ७/१२/२०२२ रोजी दुपारी १२:३० ते दुपारी २:३० या वेळेत देऊळवाडीतील शंकर मंदिर येथील सभा मंडप येथे अन्नदानाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी खूप मोठ्या प्रमाणात भाविक भक्तांनी महा प्रसादाचा लाभ घेतला. उरण शहरात दत्त जयंती निमित्त दरवर्षी खूप मोठी यात्रा भरत असते. दूरदूरचे लोक ,जनता भाविक भक्तगण देव दर्शनासाठी, यात्रेसाठी उरण मध्ये येत असतात. भाविक भक्त गण यांना चांगल्या सेवा मिळाव्यात म्हणून देऊळवाडी युवक मंडळाचे तसेच देऊळवाडी ग्रामस्थ मंडळाचे पदाधिकारी नेहमी झटत असतात. देऊळवाडी ग्रामस्थ मंडळ व देऊळवाडी युवक मंडळाच्या माध्यमातून गणेशोत्सव व महाशिवरात्रीला सुद्धा अन्नदान करण्यात येते. दत्त जयंती निमित्त केलेल्या अन्नदाना सारख्या समाजोपयोगी कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

देऊळवाडी युवक मंडळाचे निरंजन नार्वेकर, संतोष चव्हाण, प्रफुल्ल म्हात्रे, महेश झुजम, तुषार म्हात्रे, मंगेश म्हात्रे, योगेश शेलार, विपुल झूजम, सतीश पुजारी जतिन तवसाळकर, प्रवीण सुर्वे, प्रसाद म्हात्रे, विठ्ठल ममताबादे, रोमेश भुवड, भूषण म्हात्रे, आकाश जाधव, निशांत चव्हाण, आशिष न्यायी, साईनाथ ममताबादे, वेदांत नाईक, रोहन पटेल, चिराग पटेल, चित्तरंजन मुरुडकर, कमलाकर घरत आदी पदाधिकारी-सदस्य यावेळी उपस्थित होते. देऊळवाडी ग्रामस्थ मंडळ व देऊळवाडी युवक मंडळाचे पदाधिकारी व भाविक भक्तांच्या उपस्थितीत महाप्रसादाचे वाटप मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

# बोर्लीपंचतन शहराचा कोंडतोय श्वास

## अस्त, व्यस्त विक्रेत्यांच्या बस्तानासह रस्त्यांना जड झाले गाड्यांचे ओझे

**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन शहराच्या त्याच मध्यवर्ती ठिकाणी सुसज्ज बसस्थानक व्हावे अशी मागणी गेली वर्षभर पंचक्रोशीतील जनमानसातून करण्यात येत आहे. मात्र, निष्क्रिय प्रशासनाकडून अद्याप दुर्लक्ष झाल्याने या मोकळ्या परिसराला आता बकाल रूप आले असून बोर्ली शहराचा श्वास कोंडला जात आहे.

महाराष्ट्र राज्यासह देश विदेशात प्रसिद्ध असणारे पर्यटन व धार्मिक स्थळ दिवेआगर आहे. याला जोडून असणारी बोर्लीपंचतन येथील बाजारपेठ तितकीच प्रसिद्ध आहे. जवळपास एक किलोमीटर अंतरात वसलेल्या बहुचर्चित बाजारपेठेत पर्यटक व स्थानिकांची बाजारहाट करण्यासाठी मोठी गर्दी पाहायला मिळते. मात्र, या ठिकाणी सद्या एसटी महामंडळाचे बसस्थ-



ानक नाही. पूर्वी पासून बसस्थानक असणाऱ्या जागेवर रस्त्याच्या दुतर्फा अस्त, व्यस्त विक्रेत्यांच्या सोबत बेकायदा वाहनांची तासनतास होणारी पार्किंग आता शहराला विद्रुपीकरण होण्यात भर पाडत आहे.

दिवेआगर तसेच श्रीवर्धन व हरिहरेश्वर येथे धार्मिक व समुद्रकिनारी फिरण्यासाठी शेकडो पर्यटक पुणे व मुंबईहून येत असतात. पण, या पर्यटनस्थळांवर येण्यासाठी अनेक अग्निदिव्ये पार करण्याची वेळ पर्यटकांवर येत आहे. दिवेआगर येथे जाण्यासाठी बोर्ली शहारातूनच जावे लागते. पण, शहराच्या प्रवेशद्व-ारावर होणारी कोंडी पर्यटकांसह बाजारहाट करणाऱ्या स्थानिकांना डोकेदुखी ठरत आहे. याठिकाणाची कोंडी दूर करून लवकरच सुसज्ज बसस्थानक उभारावे व बोर्ली शहराचा श्वास मोकळा करावा अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# ई-सिगरेट विक्री प्रकरणी दोघांवर कारवाई; १ लाख ६४ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गुटखा सुंगधित सुपारी प्रमाणेच ई-सिगारेटलाही राज्यात बंदी आहे. बंदी असतानाही ई-सिगारेटचे व्यसन असणाऱ्यांची संख्या वाढत आहे. अशांवर पोलिसांची वक्रदृष्टी पडली असून खारघर येथे केलेल्या कारवाईत दोन जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांच्या कडून वेगवेगळ्या फ्लेवरच्या १ लाख ६४ हजार २०० रुपयांच्या ई -सिगारेट जप्त करण्यात आल्या आहेत.

राजेशकुमार मानिकचंद साहू (वय- ३२) आणि मोहमद अर्शद सलीम शेख (वय ३३) असे यातील आरोपींची नावे आहेत. दोन व्यक्ती विदेशी कंपनीच्या ई सिगारेट विक्री करण्यास येणार असल्याची माहिती अंमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. त्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक बशीर सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली पथक नेमण्यात आले. मिळालेल्या माहितीच्या आधारे भूमी टॉवर नजीक खारघर सेक्टर ४ येथे सापळा लावण्यात आला होता. त्यात दोन्ही आरोपी अडकले. त्यांची अंगझडती घेतली असता राजकुमारकडे वेगवेगळ्या कंपनींचे विविध फ्लेवरच्या ६३ ई सिगारेट आढळून आल्या. ज्याची किंमत ६३ हजार रुपये आहे.

मोहम्मद याच्याकडे वेगवेगळ्या कंपनीच्या सिगारेटचे २९ हजार १०० रुपयांचे ९७ सिगरेट पाकिटे आढळून आली. असे एकूण १ लाख ६४ हजार २०० रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे अशी माहिती अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बशीर सय्यद यांनी दिली.


## जाहिर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, श्री.राम देवराम फडतरे, रा.फ्लॅट नं.०२, गावदेवी रेसिडेन्सी, प्रभु आळी, राम गणेश गडकरी मार्ग, पनवेल-४१०२०६, जि.रायगड हे खालील वर्णन केलेली मिळकत ही श्री.गणेश रामु घोडविंदे रा.घर नं.३७७, राम मंदिर जवळ, हरिग्राम, ता.पनवेल, जि.रायगड यांच्याकडून मिळकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : वडघर-पुष्पकनोड, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नाव | भूखंड क्रमांक | सेक्टर | क्षेत्र |
|---|---|---|---|
| वडघर (पुष्पकनोड) | १७० | आर-१ | ६० चौ.मी. |

सदरहू जागा, जमीन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षिस, लीज, पोटगी, कोर्ट, जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न झाल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन मी वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करण्यात येईल व विहित मुदतीच्यानंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती / तक्रारी या आमचेवर बंधनकारक असणार नाहीत, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

दि.०७/१२/२०२२

सही/-

**श्री.राम देवराम फडतरे**

**रा.फ्लॅट नं.०२, गावदेवी रेसिडेन्सी,**
**प्रभु आळी, राम गणेश गडकरी मार्ग,**
**पनवेल-४१०२०६, जि.रायगड**
**मो.नं. ९७६९२६७४२३**


# म्हसळा तालुक्यात वारळ, तोंडसुरे आणि खारगाव बुद्रुक येथे दत्तजयंती उत्साहात साजरी

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यात वारळ, तोंडसुरे आणि खारगाव बुद्रुक येथे श्री दत्तजयंती सोहळा मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात संपन्न झाला. पहाटे पासूनच विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये काकड आरती, अभिषेक, होम,पालखी मिरवणूक, महाआरती आणि महाप्रसाद हे कार्यक्रम सकाळ सत्रात तर सायंकाळी भजन, कीर्तन आणि छ. शिवचरित्र व्याख्यान असा भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.तोंडसुरे येथे भागवत धर्म प्रचारक स. भ. प.हरी बाळ्या वागे (भरडखोल ) यांच्या कीर्तनचे आयोजन करण्यात आले होते. सर्व ग्रामस्थ, मुंबई आणि स्थानिक मंडळ, महिला मंडळ सर्वांनीच कार्यक्रम यशस्वी रित्या संपन्न केला.



# महापरिनिर्वाण दिना निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पनवेल येथील आंबेडकर भवनात सिद्धांत सामाजिक, कला, क्रीडा व सांस्कृतिक मंडळ पनवेल आणि श्री साई मेडिकल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यामाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पनवेल चे माजी नगराध्यक्ष संदीप भरत पाटील, माजी नगरसेवक गणेश चंद्रकांत कडू ,माजी नगरसेविका प्रीती जॉर्ज म्हात्रे, ॲड.सचिन कांबळे,रामेश्वर आंग्रे करंजाडे सरपंच,सचिन कांबळे सदस्य, गौतम जाधव, संजय घरत ( प्रवक्ता ), भारतीय बौद्धसभा महाराष्ट्र राज्य अध्यक्ष महेंद्र मोरे, रायगड जिल्हाध्यक्ष काशिनाथ कांबळे, पनवेल तालुका अध्यक्ष सुनील वाघपंजे, धम्मरत्न हिरामण जोशी तसेच सिद्धांत सामाजिक कला क्रीडाचे संस्थापक सागर जाधव, अध्यक्ष मयुर जाधव, उपाध्यक्ष प्रकाश जाधव, सचिव अविनाश अडगले, खजिनदार सुनील गायकवाड, सरचिटणीस सुरेश जाधव, रुपेश जाधव, रुपेश गायकवाड यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

# तळा येथे११ डिसेंबर रोजी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा डॉक्टर्स मेडिकल असोशिएशन यांच्या सहकार्याने तळा तालुक्यातील नागरिकांच्या सोयीसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे दिनांक ११ डिसेंबर २२रविवार रोजी सकाळी १० ते ५ या वेळेत डॉ. देशमुख ( डॉ. जोशी ) दवाखाना येथे आयोजित करण्यात आले आहे.



या शिबिरामध्ये अपेंडिक्स, गॅलोब्लेंडर, पोटातील गाठी, पोटदुखी स्तनाच्या किंवा थायरॉईडचे गाठी, इतर आजार हर्निया हायड्रोसिलचे आजार, मूत्र विकार, किडनी स्टोन मुळव्याध, ॲसिडिटी स्तनाचा, तोंडाचा, थायरॉईड कर्करोग अशा विविध आजारावर निदान व सल्ला देण्यात येणार असून डॉ.अपूर्व भट (एम् एस. कॅन्सर सर्जन) रोहा हे या मध्ये प्रत्यक्ष तपासणी करून सल्ला देणार आहेत.

सदर शिबिरामध्ये तपासणी केल्यानंतर निदान झाल्यावर शस्त्रक्रिया ३१ डिसेंबर २०२२ रोजी डॉ.भट नर्सिंग होम रोहा येथे करण्यात येणार आहेत. या मध्ये ५०% सुट देऊन ऑपरेशनला देण्यात येणार आहे. नांव नोंदणी ५०/-असून कृपया या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा. असे आवाहन तळा मेडिकल डॉक्टर असोसिएशनने केले आहे.


**Government of Maharashtra**

**Range Forest Office Phansad Wildlife Sanctuary**

At.New Mazgaon (Kasgaon), Post-Mazgaon, Tal-Murud-Janjira, Dist-Raigad
Email : rfophansad@gmail.com

**Tender Notice No.01/2022-23**

**Range Forest Officer-Phansad (Wildlife) Sanctuary invites proposals from interested Civil Contractors to participate in the competitive bidding process of B-1 Tendering to-**

| Sr.No. | Work Description | Work Cost |
|---|---|---|
| 1 | Construction of Culvert drain on approach Forest Road to Guard Quarter At.Sarva, Danda, Mazgaon (PWLS) Dist-Raigad | 432794/- |
| 2 | Repairs to trail line Sarve Depot in Phansad Wildlife Sanctuary Surve, Tal-Murud, Dist-Raigad | 151292/- |
| 3 | Construction of approach Road to Nisarg Information Canter At.Supegaon (PWLS) Tal Murud, Dist-Raigad | 185967/- |
| 4 | Construction of approach Road to Nisarg Information Canter At.Supegaon (PWLS) Tal Murud, Dist-Raigad | 116343/- |

B-1 Tender Sumission would be offline & the deadline to submit the proposals is 15/12/2022 at 5.00 PM. only.

(Blank B-1 Tenders forms are available at Range Forest office Phansad for Rs.250/- each (18% GST Extra) From 10.00 AM On 08/12/2022 to 15/12/2022 up to 3:00 PM.)

**Sd/-**
**Range Forest Officer**
**Phansad (Wildlife) Sanctuary**


पृष्ठ क्र.१ वरुन...

## पोलादपूर तालुक्यात पुन्हा पोक्सो गुन्हा

वेगवेगळ्या ठिकाणी तिच्या इच्छेविरूध्द शारिरीक संबंध ठेऊन तिला पाच महिन्यांची गरोदर केल्याप्रकरणी त्याच्याविरूध्द गुन्हा र.नं.१२३२०२२ नुसार भा.दं. वि.३७६(२)(एन)सह पोक्सोप्रमाणे ४,६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर प्रकरणी अल्पवयीन नवतरूणीचा गर्भपात करण्यासाठी मुंबईतील जे.जे.हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले असता तेथील डॉक्टरांनी थेट तेथील पोलीस ठाण्यामध्ये तिच्या अल्पवयीन असल्याने गुन्हा दाखल केला आणि सदरचे प्रकरण रायगड जिल्हा पोलीस अधिक्षक यांच्याकडील आर.बी. ४०६-गुन्हा वर्ग-२०२२-५१९३ या जावक क्रमांकाच्या पत्रान्वये पोलादपूर पोलीसांना आदेश प्राप्त होताच दि. ४ डिसेंबर २०२२ रोजी रात्री १० वाजून ५२ मिनीटांच्या सुमारास पोलादपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी पोलादपूर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरिक्षक युवराज म्हसकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरिक्षक भोसले अधिक तपास करीत असून याप्रकरणी मोरगिरी पोक्सोप्रकरणाची पुनरावृत्ती झाली असल्यास एकापेक्षा अधिक आरोपी असण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## पेण अर्बन बँक घोटाळा ठेवीदारांचे पैसे परत करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम करावा : मुख्यमंत्री

या मालमत्ता जप्त केल्या आहेत. ठेवीदारांच्या पैशांमधून घेतलेल्या जागा सिडकोने खरेदी करुन ठेवीदारांचे पैसे परत देण्याचा एक पर्याय असून त्यादृष्टीने या जागांचे सिडकोने मूल्यांकन करण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी दिले. ठेवीदारांची सुमारे ६११ कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेची देणी असून हे सगळे गरीबांचे पैसे आहेत, ते त्यांना मिळालेच पाहिजेत, त्यासाठी जप्त मालमत्तांचा लिलाव करावा, वसूली करावी आणि हे पैसे परत करावे, अशा स्पष्ट सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या. सिडकोने या जप्त मालमत्तांचे मूल्यांकन तातडीने करण्याची प्रक्रिया सुरु करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी सिडकोचे व्यवस्थापकीयसंचालक डॉ. संजय मुखर्जी यांना दूरध्वनीवरुन दिले.

गरीब ठेवीदारांना त्यांच्या श्रमाचा पैसा मिळालाच पाहिजे ही आपली भूमिका असून त्यासाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी करा, प्रशासकांनी आपली जबाबदारी योग्यरित्या पार पाडावी आणि गरीबांचे हे पैसे परत देण्याची कार्यवाही पूर्ण करावी, असे आवाहनही मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी केले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## फिरते स्टेडियम व प्रत्येक तालुक्यात कुस्तीला मॅट उपलब्ध करून देणार : आ.जयंत पाटील

**दै.रायगड नगरी । रोहा**

सानेगाव यशवंतखार येथे नंदकुमार म्हात्रे यांनी चांगल्या पद्धतीने कुस्ती स्पर्धा आयोजित केले आहे. यातूनच खेळाडूंना प्रेरणा मिळते. कबड्डी प्रमाणे कुस्तीतही रायगड जिल्ह्याततून राष्ट्रीयस्तरावरील खेळाडू तयार व्हावे ही अपेक्षा व्यक्त करीत आ.जयंत पाटील यांनी प्रत्येक तालुक्यात ज्याप्रमाणे कबड्डीसाठी मॅट उपलब्ध करून दिला आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक तालुक्यात कुस्ती खेळासाठी मॅट उपलब्ध करून देणार आहे. यासह उन्हाळा व पावसाळ्यात स्पर्धा भरवण्यासाठी तीन ते चार हजार प्रेक्षक बसू शकतील असे फिरते स्टेडियम उपलब्ध करून देणार असल्याचे आ. जयंत पाटील यांनी सांगितले. त्यासाठी माझा आमदार निधी व आ. बाळाराम पाटील यांचा आमदार निधी व जिल्हा नियोजनांमधून उपलब्ध निधी करून देणार असल्याचे यावेळी आ.जयंत पाटील यांनी आश्वासन दिले

रोहा तालुक्यात स्व.दिनाभाई मोरे क्रीडांगण सानेगाव यशवंतखार हायस्कूल पटांगण येथे आयोजित करण्यात आलेल्या रायगड जिल्हा कुस्ती चाचणी स्पर्धा २०२२ या स्पर्धांच्या उद्घाटन प्रसंगी आ.जयंत पाटील बोलत होते. रायगड जिल्हा कुस्तीगीर संघ अध्यक्ष आ. बाळाराम पाटील, माजी आ. पंडित पाटील, जेष्ठ नेते शंकरराव म्हसकर, रायगड जिल्हा कुस्तीगीर संघ कार्याध्यक्ष सुभाष घासे, उपाध्यक्ष नंदकुमार म्हात्रे, शेकाप सरचिटणीस राजेश सानप, लक्ष्मण महाले, शिवराम महाबळे, अभिशेठ देशमुख, हेमंत ठाकूर, गणेश मढवी, मोतीराम गीजे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी आपल्या प्रास्ताविकात नंदकुमार म्हात्रे यांनी याच मैदानात ७ वर्षा पुर्वी स्पर्धा आयोजित करण्यात आले होते.यावेळी ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी ग्रामस्थ,मुंबई मंडळ,ग्रामपंचायत,रायगड जिल्हा कुस्तीकर संघचे पदाधिकारी,खेळाडू, पंच हे प्रयत्न करीत असल्याचे सांगितले. या जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत ३०० च्या आसपास रायगड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील मुले व मुली हे खेळाडू सहभागी झाले आहेत. ही स्पर्धा बघण्यासाठी रायगड जिल्ह्यात तालुक्यातील मोठ्या संख्येने प्रेक्षक उपस्थित होते

# माथेरानमधील राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांचा शिंदे गटात जाहीर प्रवेश

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान नगरपरिषदेच्या निवडणुका जसजशा जवळ येत आहेत तसतसे येथील बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेच्या शिंदे गटात नवोदित कार्यकर्त्यांचा भरणा वाढताना दिसत आहे. आज कर्जत खालापूर मतदार संघाचे कार्यसम्राट आमदार महेंद्र थोरवे यांच्या शिवतीर्थ या निवासस्थानी उपजिल्हाप्रमुख भाई गायकर, कर्जत तालुका प्रमुख संभाजी जगताप, माजी उप सभापती मनोहरशेठ थोरवे, माथेरान शिंदे गटाचे शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी, उप शहरप्रमुख प्रमोद नायक,युवा सेनेचे गौरंग वाघेला यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये माथेरान मधील संत रोहिदास नगर येथील राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या एकूण सोळा कार्यकर्त्यांनी स्वेच्छेने, बिनशर्त कसलीही अभिलाषा न बाळगता जाहीर प्रवेश केला आहे.



यामध्ये किशोर कदम, नितेश कदम, जगदीश कदम, सचिन काळे, दीपक सोनावणे, आकाश कांबळे, अतुल कारंडे, गणेश माने, शशिकांत माने, राजू वर्पे, उमेश कदम, ओंकार ननावरे, प्रसाद सोनावणे, सूर्यकांत सोनावणे, प्रवीण कांबळे, महेश काळे यांनी प्रवेश केला आहे. चंद्रकांत चौधरी यांच्याकडे गावातील एक दानशूर व्यक्तिमत्त्व म्हणून पाहिले जाते. वेळप्रसंगी मदतीला धावून जाणारे हे निस्वार्थी असून भले वक्तृत्व नसले तरी त्यांच्या अंगी नेतृत्व आणि पक्षाला उभारी देण्याचे कर्तृत्व आहे. त्याचप्रमाणे उप शहरप्रमुख प्रमोद नायक हे सुध्दा मदतीला धावून येतात. त्यामुळेच त्यांच्या या कार्यपद्धती वर खुश होऊन आम्ही बाळासाहेबांच्या शिवसेनेचे शिंदे गटाचे सदस्यत्व स्वीकारले असल्याचे नवोदित प्रवेश धारकांनीं सांगितले आहे. दिवसेंदिवस शिंदे गटात विविध प्रभागातील कार्यकर्त्यांचा ओघ वाढत असून आगामी काळात नगरपरिषदेच्या निवडणुकीमध्ये याचा नक्कीच फायदा होईल. आणि भगवा निश्चितच फडकेल असा विश्वास चंद्रकांत चौधरी यांनी व्यक्त केला आहे.

> गेली २० वर्ष आम्ही राष्ट्रवादी कॉंग्रेस मध्ये निस्वार्थीपणे काम करत होतो. परंतु माजी नगरसेवक स्वर्गीय दयानंद डोईफोडे होते तोपर्यंत सर्वकाही व्यवस्थित आणि सुरळीत होते आम्ही ज्यांना निवडून दिले त्यांनी फक्त आपल्या कुटुंबातील सदस्यांना पुढे आणण्यासाठी प्रयत्न केले. आमच्या तरुणांकडे कोणीही लक्ष दिल नाही सतत डावललं जात होत तरुणांना योग्य नेतृत्व नसल्यामुळे आम्ही सर्वांनी एकमतांनी चंद्रकांत चौधरी व प्रमोद नायक यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून आज आम्ही बाळासाहेबांची शिवसेना या पक्षांमध्ये जाहीर प्रवेश केला आहे.
>
> **नितेश कदम, संत रोहिदास नगर**
> **सक्रिय कार्यकर्ते माथेरान**

## कन्यादान योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी अर्ज सादर करावेत : शशिकला अहिरराव

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण अंतर्गत रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या सामूहिक विवाह सोहळ्यात सहभागी होणाऱ्या दांपत्याकरिता तसेच स्थानिक स्वराज्य संस्था व नामांकित स्वयंसेवी संस्थाकडून कन्यादान योजनेसाठी अर्ज मागवण्यात येत आहेत.

या योजनेचा लाभ घेणाऱ्या दाम्पत्याने योग्य त्या कागदपत्रासह ०७ डिसेंबर २०२२ पासून विहित नमुन्यात अर्ज सादर करावेत. सामूहिक विवाह सोहळ्यात सहभागी जोडप्यांना रु.१० हजार इतके अनुदान देय आहे. तसेच लग्न सोहळा आयोजित करण्यासाठी सेवाभावी संस्था तयार असल्यास कार्यक्रम आयोजन करण्यासाठी रु.१० हजार इतके अनुदान देय आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदारांनी– विहित नमुन्यातील कन्यादान योजनेचा अर्ज, दोन पासपोर्ट साईज फोटो, रहिवाशी दाखला, जातीचे दाखले, वयाबाबतचा शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र/शाळा सोडल्याचा दाखला, विवाह न झाल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु. १०० च्या स्टॅम्पवर नमूद करावे. लाभार्थ्यांना विहित नमुन्यातील अर्ज प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण जि.रायगड या कार्यालयातील कन्यादान योजना कक्षाकडून उपलब्ध करून दिले जाणार आहेत.

कन्यादान योजनेचा लाभ जास्तीत जास्त अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांनी घ्यावा व या योजनेकरिता अर्ज सादर करावेत, असे आवाहन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण श्रीम.शशिकला अहिरराव यांनी केले आहे.

## नगरपंचायत कंत्राटी कामगारांनी दिली डॉ. आंबेडकरांना मानवनंदना

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

भारतीय घटनेचे शिल्पकार आणि आणि थोर दलितोद्धारक महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दि. ६ डिसेंबर २२ रोजीम्हसळा नगरपंचायत येथे नगरपंचायत कंत्राटी कामगार संघटनेच्या माध्यमातून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महपरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी नगरपंचायतीचे घनकचरा संकलन विभागाचे प्रमुख सुरेश जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या या कार्क्रमास ऋषाद येलवे, महादेव साळवी, अनंत कासारे, दिशा गायकवाड, कृष्णा तांबे, वारे आदि मान्यवर उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या प्रारंभी अत्यंत भक्तीमय वातावरणात बुद्धवंदना म्हणण्यात आली. सफाई कर्मचाऱ्यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. उपस्थितानी डॉ.आंबेडकर यांच्या भारतीय राज्यघटना निर्मितीचे व दलितांप्रती केलेले महान कार्य यासंबंधी आपल्या विनम्र भावना व्यक्त करुन त्यांचे स्मृतीस आदरपूर्वक अभिवादन केले.डॉ.आंबेडकर यांनी दलितो– द्धारासाठी केलेले महान कार्य सांगताना कृतज्ञतेप्रती काही वक्त्यांना त्यांचे अश्रु आवरता आले नाहीत.

## रोह्यात १२३ जणांची नेत्र तपासणी ; ७० मोतीबिंदू रुग्णांना शास्त्रकियेसाठी पाठविले

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहा येथील नेत्ररुग्ण तपासणी शिबिरात बुधवारी १२३ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ७० रुग्णांना आजच आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रियेसाठी पाठवण्यात आले. गेल्या ६ महिन्यांत रोहा सिटिझन फोरम ट्रस्टच्या माध्यमातून तब्बल ४०५ नेत्ररुग्णांना नवी दृष्टी मिळाली आहे.



रोहा सिटिझन फोरम ट्रस्ट आणि आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल, नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले. शासकीय विश्रामगृह दमखाडी, रोहा येथे झालेल्या या शिबिरात अल्पदरात चष्मे वाटप, मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर पार पडले. हॉस्पिटलचे टीम मॅनेजर प्रकाश पाटील, डॉ वामसी कृष्णन, डॉ जशनसिंग, सुखविंदर कौर, प्रिया साळवी, नेत्रा होडबे, नरेश आलवार, शिल्पेश साटम आदींनी रुग्णांची तपासणी केली.

रोहा सिटिझन फोरम ट्रस्ट चे अध्यक्ष नितीन परब, प्रदिप देशमुख, मिलिंद अष्टिवकर, दिलीप वडके, श्रीकांत ओक, अहमदशेठ दर्जी, उस्मानभाई रोहेकर, संतोष खटावकर, महेश सरदार, संदीप सरफळे, इल्यास डबीर, दिनेश जाधव, शैलेश रावकर, सचिन शेडगे, परशूराम चव्हाण, अमोल देशमुख, प्रशांत देशमुख, निलेश शिर्के, सिद्देश ममाले, दिनेश मोहिते, समिधा अष्टिवकर, भावेश अग्रवाल, बिलाल मोर्बेकर आदी फोरम च्या सर्व सदस्यांनी शिबीर यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली. रोहा सिटीझन फोरम ट्रस्टचे अध्यक्ष नितिन परब यांनी सहयोगी संस्थांचे आणि शिबिरासाठी परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

## नवीन पनवेल येथे १० डिसें. ला राज्यस्तरीय वधु - वर मेळावा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

संत शिरोमणी रोहिदास विकास मंडळा तर्फे शनिवार दि. १० डिसें. रोजी ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र, सिकेटी शाळे जवळ, नविन पनवेल येथे वर्धुवर सुचक व परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. चर्मकार समाजातील विवाह इच्छुक मुलामुलींना आपल्या पालकांसह उपस्थित राहुन या मेळाव्याचा लाभ घ्यावा असे अवाहन मंडळाचे अध्यक्ष कष्णा गायकवाड यांनी केले आहे.

चर्मकार समाजातील मुला– मुलींना योग्य जीवनसाथी निवडणे सुलभ व्हावे यासाठी नविन पनवेल येथिल या मंडळातर्फे गेली सुमारे १९ वर्षे अखंडितपणे वर्धुवर सुचक व परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात येत असते. या मेळाव्यात सहभाग घेणाऱ्या इच्छुक मुला मुलींनी स्वताचे दोन रंगीत फोटो सोबत आणावे, नाव नोंदणी दुपारी १२ ते २, ओळख, परिचय सत्र २ ते ४ असे नियोजन करण्यात आले असुन अधिक माहीतीसाठी मंडळाचे अध्यक्ष कष्णा गायकवाड ९८१९९२७५९, सचिव सुरेश पुगांवकर ७२०८८६४८४५, खजिनदार सत्यवान बेलापुरकर ९८२०३९८०३९ यांच्याकडे संपर्क साधावे असे अवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे.

## मत्स्यगंधा एक्स्प्रेसमध्ये महागड्या मोबाईलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मत्स्यगंधा एक्स्प्रेस मधून प्रवास करणाऱ्या एका प्रवाशांचा महागडा मोबाईल चोरी झाल्याची घटना घडली आहे.

भांडुप येथील साविया रोचा हे कार्यक्रमासाठी मडगाव येथे गेले होते. तेथून ते मत्स्यगंधा एक्स्प्रेसने ते मुंबईला परत येत होते. प्रवासादरम्यान त्यांना झोप लागली असता चोरट्यांनी त्यांच्या बॅगेतील २६ हजार रुपये किमतीचा मोबाइल चोरून नेला. पहाटे पनवेलला एक्स्प्रेस पोहोचल्यानंतर त्यांच्या हे लक्षात आल्याने त्यांनी याबाबत पनवेल रेल्वे पोलीस स्टेशन मध्ये तक्रार नोंदवली आहे.

---

मा.इंदलकर साहेब
अर्जदारतर्फे वकील : ॲड.ज्योती सरोदे

### जाहिर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब, यांचे कोर्टात
क्रिमिनल चौ.अर्ज क्र.१३६९/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१८/०१/२०२३

श्री.केदार किशोर चौधरी
वय : २८ वर्षे, धंदा : व्यापार
रा.फ्लॅट नं.बी–००२, साई कृष्णा सोसायटी,
सावरकर चौक, लोखंडीपाडा, पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
मा.निबंधक
जन्म मृत्यू विवाह नोंदणी प्राधिकारी,
पनवेल शहर महानगरपालिका,
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाले

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार श्री.केदार किशोर चौधरी, वय : २८ वर्षे, धंदा : व्यापार, रा.फ्लॅट नं.बी–००२, साई कृष्णा सोसायटी, सावरकर चौक, लोखंडीपाडा, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे कायमस्वरुपी राहत आहेत. तसेच अर्जदार यांचे आई वडील अर्जदार यांच्या जन्माच्या पूर्वी पनवेल येथील परदेशी आळी, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत होते. त्यावेळी अर्जदार याचा जन्म दि.१३/०७/१९९४ रोजी नवीन पनवेल श्रीयश हॉस्पिटल, ता.पनवेल येथे रुग्णालयात झालेला आहे. परंतु काही कारणास्तव अनावधनाने अर्जदार श्री.केदार किशोर चौधरी याच्या जन्माची नोंद करण्याचे राहून गेले. आणि श्री.केदार किशोर चौधरी यांच्या जन्माची नोंद होण्याकरिता या मे.कोर्टात अर्ज केलेला आहे.

अर्जदार श्री.केदार किशोर चौधरी यांचा जन्म दि.१३/०७/१९९४ रोजी नवीन पनवेल श्रीयश हॉस्पिटल, ता.पनवेल येथे रुग्णालयात झालेला आहे. येथे झालेला आहे किंवा कसे याबद्दल कोणासही काही कळविण्याचे असेल व सदरहू अर्जास कुणाची हरकत असेल तर या जाहीर नोटीसच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्याने या मे.न्यायालयात हजर राहून आपल्या कायदेशीर हरकती नोंदविण्याच्या आहेत. या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत योग्य हरकती न आल्यास तर सदरहू न्यायालयात अर्जदार यांसकडून योग्य तो पुरावे घेवून त्यास त्याच्या अर्जदार श्री.केदार किशोर चौधरी यांच्या जन्माची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देण्यात येईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

आजदि.६/१२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व मे.कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**फौ.न्याया, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्याया, पनवेल**

---

मा.गोडसे साहेब
प्रो.जमा रु.५०/– अर्जदारतर्फे वकील ॲड.शुभांगी केदार लाड

### जाहिर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब, वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१८११/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१७/०१/२०२३

कै.भगवान गणपत कदम मयत यांचे वारस
१) श्रीमती.शुभांगी भगवान कदम
वय : ५८ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.प्रशांत भगवान कदम
वय : ३७ वर्षे, धंदा : काही नाही
३) प्रियांका भगवान कदम
वय : ३५ वर्षे, धंदा : काही नाही
अर्जदार क्र.१ ते ३ रा.बेलेंत्रा फेज–२ बी,
सातवा मजला, फ्लॅट नं.७०४, प्लॉट नं.००२,
मु.कराडे खुर्द, पो.गुळसुंदे, पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ यांचे पती आणि अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील कै.भगवान गणपत कदम यांचा मृत्यू दि.०९/०४/२०२२ रोजी एम.जी.एम. हॉस्पिटल, कळंबोली महाराष्ट्र येथे झालेला असून कै.भगवान गणपत कदम हे हयात असताना त्यांच्या मृत्यूसमयी त्यांचे मालकी हक्कात स्वसंपादीत मु.कराडे खुर्द, पो.गुळसुंदे, पनवेल, जि.रायगड येथे निवासी सदनिका असून त्या निवासी सदनिकेचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**निवासी मिळकतीचे वर्णन**
**मु.कराडे खुर्द, पो.गुळसुंदे, पनवेल, जि.रायगड येथील**

| बिल्डींगचे / सोसायटीचे नाव | Flat No. निवासी सदनिका क्र. | Floor मजला | क्षेत्र चौ.फुट |
|---|---|---|---|
| बेलेंत्रा सोसायटी फेज–२ | ७०४ बी विंग | सातवा | ३५.५०० चौ.फुट कारपेट एरिया |

वरील निवासी सदनिके संदर्भात अर्जदार यांना वारस दाखला मिळणेकरिता या मे.न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांना वारस दाखला देण्यबाबत कुणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात योग्य त्या कागदपत्रकासह सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास अर्जदारांकडून कायदेशीर साक्षी पुरावे नोंदवून अर्जदार यांना वारस दाखला प्रदान करण्यात येईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

आज दि.०७/१२/२०२२ रोजी कोर्टाच्या सही शिक्क्याने दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.गोडसे मॅडम
ॲड.नरेश टी. म्हसकर
(पनवेल)

### जाहिर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१८०७/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१८/०१/२०२३

श्री.प्रल्हाद रामा पाटील
वय : ४५ वर्षे, धंदा : शेती
रा.वाघिवली, पो.पारगांव, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांची आजी कै.धोंडीबाई चाया पाटील ही दि.०४/०५/१९८३ रोजी मौजे : वाघिवली, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेली आहे. तसेच अर्जदार यांचे वडील व कै.धोंडीबाई चाया पाटील यांचा मुलगा कै.रामा चाया पाटील हे देखील दि.०४/०३/२०२१ रोजी मौजे : वाघिवली, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत.

तसेच कै.धोंडीबाई चाया पाटील यांचे पती म्हणजेच अर्जदार यांचे आजोबा कै.चाया बाळू पाटील हे देखील सन १९८६ मध्ये मौजे : वाघिवली, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. सबब कै.चाया बाळू पाटील यांचा सरकारी कार्यालयातून मृत्यूचा दाखला उपलब्ध झालेला नाही.

कै.धोंडीबाई चाया पाटील यांचे सामाईक मालकीच्या मौजे : काळुंद्रे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या शेतजमीन मिळकती सिडकोतर्फे संपादीत झालेल्या आहेत.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे : काळुंद्रे, ता.पनवेल, जि.रायगड**

| युनिट केस नं. | गावाचे नांव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| काळुंद्रे ७०/७९ (३) | काळुंद्रे | ९७ | २ ए | ०–०८–० | २.०० |
| काळुंद्रे ७०/७९ (२) | काळुंद्रे | ९७ | १ पै | ०–०३–७ | २.६२ |

वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी मे.कोर्टास अर्ज केला आहे. वरील मिळकतीत अर्जदार यांचा कायदेशीर हक्क व अधिकार असल्याने सदर मिळकती संदर्भात अर्जदार यांच्या नावाने वारस दाखला देण्याबाबत कुणाची हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास वारस दाखला अर्जदारांच्या नावे प्रदान करण्यात येईल.

आज दि.०६/१२/२०२२ रोजी कोर्टाच्या सही शिक्याने दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

Sonawane Judge
Adv. Shivaji Shingote

### PUBLIC NOTICE

IN THE COURT OF CIVIL JUDGE (S.D.)
K.M.SONAWANE PANVEL, AT PANVEL
M.A.No.1752/2022
Exh : 8

1) MR.RAJKUMAR BRIJLAL VERMA
Age : 65 years, Occ :
R/at Flat No.B/303, Riddhi Siddhi Apt.
Plot No.06, Ulwe, Sector-05,
Wahal, Raigad-410206
2) MR.KISHORE BRIJLAL VERMA
Age : 63 years, Occ :
R/at Flat. A/304, Shankeshwar Pallazo,
Plot No.182, Ulwe Sector-09,
Gavhan, Raigad-410206
3) MRS.MEETA MILIND SAPRE alias
MEETA BRIJLAL VERMA
Age : 62 years, Occ :
R/at Flat. C/303, Shakti Residency,
Plot No.66, Ulwe, Sector-05,
Wahal, Raigad-410206
4) MRS.MALTI SANDEEP SINGHAL alias
MALTI BRIJLAL VERMA
Age : 60 years, Occ :
R/at Flat. 403, Platinum Pilasio 2,
Plot No.221, Sector-23,
Uran, Raigad-410206 — Applicants

That Late Mrs.Kailash Brijlal Verma was the Mother of Applicants who expired on 30/01/2021 Vinamra Swaraj Hospital, Vashi. The Property Description Standing in The Name of Deceased is Attached Herewith.

**SCHEDULE OF PROPERTY 'A'**

Name Of the Property Holder : Late Mrs. Kailash Brijlal Verma & Mr.Rajkumar Brijlal Verma (Jointly Owned)

Flat No. B/303, Riddhi Siddhi Apartment, B Wing, Plot No 06, Ulwe, Sector - 05, Wahal, Raigad-410206, admeasuring area 52.22 Sq. Mtrs, Agreement Value Ra. 27,00,000/- (Rupees Twenty-Seven Lakhs Only) (For 50% share i.e., Rs. 13,50,000/-

Whereas the above-named applicants have filed present misc. application for heirship certificate under Bombay regulation VIII of 1827, the court of civil judge (S.D.) Panvel.

You the members of public are hereby given proclamation to appear in the court of civil judge (S.D.) Panvel in person or by pleader duly instructed and to file your say / objections if any Public Notice within 30 days from the date of publication of public notice, failing which the said application will be held presuming that there is no objection from anybody and the application will be finally decided.

Given under the hands and seal of the court this 5 Day of 12/2022

Sd/-
Jr.Clerk
CJJSD PANVEL

Court Seal

Sd/-
Asst.Superident.
CJJSD PANVEL

